आरोग्य सेवा संचालनालय,
( महाराष्ट्र राज्य )
'आरोग्य भवन' सेंट जार्जेस रुग्णालय, आवार पी. डिमेला रोड, मुंबई - ४००००१

| कार्यालय | दूरध्वनी ०२२ | Website : http:// arogya.maharashtra.gov.in |
|---|---|---|
| संचालक | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (अर्थव प्रशासन) | २२६२११८६ | Email : miscell@rediffmail.com |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | २२६२१९७३ | Email : aodesk2adhs@gmail.com |
| प्रशासकीय अधिकारी | २२६२६२०४ | |

क्रसंआसे/मवैआसे/२अ/टे-३/ वै.अ. गट - पदभरती८७७/ 1606 /१९
दि. २० /०७ / २०१९

# सूचना

विषय- महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ ( पे बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड वे ५४०० सहाव्या वेतन आयोगानुसार ) मधील वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त असलेल्या एकुण ८७७ पदे भरतीबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने समक्रमांकित सूचना पत्रान्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबतच्या सूचना दिनांक १९.०७.२०१९ रोजीच्या सूचना पत्रानुसार दिलेल्या आहेत.

त्यास अनुसरुन गुणवत्ता यादी तयार करताना खालील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी यांच्या दिनांक ३०/१०/२००० च्या सेवा प्रवेश नियमातील नियम क्रमांक ३ मधील (क) मधील (दोन) मधील (ब) च्या परंतुकात वैद्यकीय शास्त्राची पदव्युत्तर पदवी धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल असे नमुद आहे. त्यास अनुसरुन व ग्रामीण रुग्णालये , उपजिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, स्त्री रुग्णालये व जिल्हा रुग्णालये यातील मंजूर आकृती बंधानुसार विशेषाज्ञांची उपलब्धता व रिक्त पदे लक्षात घेवून पुढील ८ पदव्युत्तर पदवी धारकांना प्राधान्याने समुपदेशनासाठी बोलविण्यात आलेले आहे.

१. बधिरीकरणतज्ञ
२. शल्यचिकित्सक

Scanned by CamScanner

३. भिषक
४. बालरोगतज्ञ
५. स्त्रीरोग तज्ञ
६. पीएसएम
७. क्ष- किरणतज्ञ
८. मानसोपचार तज्ञ

यापुर्वी प्रसिध्द केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील गुणानुक्रम विचारात घेवूनच उपरोक्त विशेषज्ञ शाखेतील ७४९ उमेदवारांना प्राधान्याने पहिले २ दिवस व त्यानंतर उर्वरित इतर विशेषज्ञ व एमबीबीएस अर्हताधारक उमेदवरांपैकी प्रथम ४०१ उमेदवारांना तिस-या दिवशी त्यांच्या गुणानुक्रमानुसारच समुपदेशनासाठी बोलविण्यात आलेले आहे.

(श्री संजय पतंगे)
सहसंचालक, (अर्थ व प्रशासन)
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

Scanned by CamScanner